अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
वर्ष : २४ वे | अंक : १२५ वा | किंमत : ५ रुपये | पाने १२
www.surajyadigital.com
। सोमवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ ।




# एकत्रीकरणाची भाऊबंदकी

- राष्ट्रवादी स्वतंत्र, पण एकत्रीकरणाची चर्चा आवश्यक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस
- आम्ही 'एनडीए' सोबतच : तटकरे
- एकत्रीकरण ही दादांची इच्छा : शरद पवार गट

मुंबई/प्रतिनिधी

**राष्ट्रवादी काँग्रेस हा स्वतंत्र पक्ष आहे, त्यांचे निर्णय ते घेऊ शकतात पण राष्ट्रवादी हा एन डी ए भाग असल्याने एकत्रिकरणाच्या मुद्द्यावर त्यांना आपल्याशी चर्चा करावी लागेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी स्पष्ट केले. अजितदादा आपल्याशी मोकळेपणाने चर्चा करायचे त्यांच्या मनात जर एकत्रीकरणाचा विषय असता तर त्यांनी तो आपल्याला सांगितला असता पण त्यांनी याचा साधा उल्लेख ही कधी केला नव्हता असे फडणवीसांनी स्पष्ट केल्यामुळे विलीकरणाच्या मुद्यावर खळबळ माजली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी माध्यम प्रतिनिधींशी चर्चा केली यावेळी पत्रकारांनी त्यांना दोन्ही राष्ट्रवादींच्या विलीनीकरणावर प्रश्न विचारले. या प्रश्नांचे उत्तर देताना त्यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून केल्या जाणाऱ्या विलीनीकरणाच्या दाव्याला एका प्रकारे खोडून काढले. अजित पवार आणि आम्ही खूप चर्चा करायचो. दोन्ही पक्षांच्या एकत्रीकरणाची चर्चा होत असती तर अजितदादांनी आम्हाला त्याची कल्पना दिली असती. एकत्रीकरणाबाबत आम्हाला सांगितलं असतं, असं फडणवीस म्हणाले. तसेच अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष हा एक स्वतंत्र पक्ष आहे. त्या पक्षाचे निर्णय तेच घेतात, असे सांगत अजितदादांच्या पक्षाच्या स्वतंत्र अस्तित्व अधोरेखित केले.**

देवेंद्र फडणवीस म्हणाले, दोन्ही राष्ट्रवादींचे विलीनीकरण होणार असते तर आम्हाला त्यांबाबत सांगितले गेले असते. आता यापुढेही राष्ट्रवादींच्या एकत्रीकरणावर चर्चा होत असेल तर त्याआधी आमच्याशी चर्चा करावी, अशी भूमिका फडणवीस यांनी घेतली.

दरम्यान, अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष सध्या भाजपा आणि शिंदे यांच्या शिवसेनेसोबत सत्तेत आहे. तर शरद पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष विरोधी बाकावर आहे. त्यामुळे राष्ट्रवादीचे विलीनीकरण करायचे असेल तर शरद पवार यांच्या पक्षाला सत्तेत सहभागी व्हावे लागेल किंवा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाला सत्तेतून बाहेर पडावे लागेल.

अजित पवारांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी गट एकत्र येणार, अशी चर्चा रंगत असतानाच आता 'विलिनीकरणा'च्या मुद्यावरून राजकारण तापले आहे. शरद पवार गटाकडून एक 'सायलेंट' व्हिडिओ समोर आणला असून, त्यातून अनेक मोठे दावे केले जात आहेत. राष्ट्रवादीत सत्ता संघर्ष पेटला आहे.तीनच दिवसांत दोन्ही गट विलीनीकरणाच्या मुद्यावरून एकमेकांवर कुरघोड्या करींत असल्याचे चित्र समोर आले.

विलीनीकरणाबाबत थेट शरद पवार आणि अजित पवार यांची बैठकच झालेली नव्हती, या दाव्याला छेद देणारा एक व्हिडीओ शनिवारी माध्यमांपर्यत जाणीवपूर्वक पोहोचविण्यात आला. त्यात शरद पवार, अजित पवार, जयंत पाटील, राजेश टोपे, हर्षवर्धन पाटील, खा. डॉ. अमोल कोल्हे, शशिकांत शिंदे, आ. रोहित पवार हे नेते दिसत आहेत. ही केवळ व्हिडीओ क्लिप आहे आणि त्यात ऑडिओ नाही. त्यामुळे चर्चा नेमकी विलीनकरणाची होती की जिल्हापरिषद निवडणुकींबाबत हे कळत नाही असा मुद्दा उपस्थित केला आहे.

## आम्ही 'एनडीए' सोबतच : तटकरे

■ कोणाला काय म्हणायचं ते म्हणू देत आमची भूमिका स्वच्छ आहे. आम्ही अजितदादांच्या परिवाराशी आणि दादांनी जो राष्ट्रवादी काँग्रेसचा परिवार उभा केला त्याच्याशी सुसंगत असा निर्णय घेतला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधीमंडळ गटाचा नेता कोणी निवडायचा? हा राष्ट्रवादीचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये तो राष्ट्रवादी पक्षाचा अधिकार आहे, त्यामुळे तो मुद्दाच येत नाही. विलिनीकरणाच्या संदर्भात मी आजच नाही तर अनेकवेळा स्पष्ट केलेलं आहे, आम्ही एनडीएसोबत आहोत, आणि आम्ही कायम एनडीएसोबत राहणार आहोत. हे अजितदादा असताना देखील मी बोलत होतो, असंही यावेळी तटकरे यांनी म्हटलं आहे.



## प्रदेशाध्यक्ष तटकरेंचे पहिली भूमिका...

या व्हिडीओबाबत अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी माध्यमांना सांगितले की, बारामतीतील कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने आम्ही एकत्र आलो होतो, तेव्हा चहापान करतानाचा तो व्हिडीओ आहे. त्यानंतर खुद्द अजित पवार यांनी लगेच स्पष्ट केले होते की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढण्याबाबत तेव्हा चर्चा झाली होती. मात्र, विलीनीकरणाबाबत बोलणे झाले नव्हते.

## विरोध भाजपचा की राष्ट्रवादीच्या नेत्यांचा?

राजकीय जाणकारांच्या मते विलीनीकरणास भाजपच्या राज्य आणि केंद्रातील नेत्यांचाही विरोध असल्याचे सांगितले जात असले तरी शरद पवार गटातील एका ज्येष्ठ नेत्याने दावा केला की, अजित पवार गटातील दोनतीन बडे नेते विलीनीकरणाच्या विरोधात आहेत, म्हणूनच ते रखडले.

## १७ जानेवारीची बैठक

खात्रीलायक सूत्रांनी सांगितले की, शरद पवार गटाच्या मुंबईतील एका महिला नेत्याने विलीनीकरणाच्या कथित चर्चेबाबतचा तो व्हिडीओ शनिवारी सकाळी चॅनेल्सकडे पोहोचविला. विलीनीकरणाबाबत शरद पवार आणि अजित पवार यांच्या समक्षच चर्चा झाली होती हे सिद्ध करण्याचा प्रयत्न त्यातून करण्यात आला. विलीनीकरण ही अजितदादांचीच इच्छा होती आणि आता त्यांच्याच पक्षाचे ज्येष्ठ नेते विलीनीकरणाला खो देत असल्याचा नरेटिव्ह तयार करण्याचा प्रयत्न या निमित्ताने करण्यात आला. १७ जानेवारी रोजी बारामती येथे ही बैठक झाली होती.





## दादा, तटकरे आणि सुप्रिया सुळेंची बैठक : अनिल देशमुख



दोन्ही राष्ट्रवादी एकत्र कधी येणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे. याबाबत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते अनिल देशमुख यांनी अजितदादा, सुनील तटकरे आणि सुप्रिया सुळे यांची बैठक झाली असल्याचा गौप्यस्फोट केला आहे.

## शेवटची बैठक जयंत पाटलांच्या घरी पहाटे तीन वाजेपर्यंत...



आतापर्यंत बारा ते तेरा बैठका झाल्या होत्या. जयंत पाटलांच्या घरी शेवटची बैठक झाली होती. ती रात्री दहा ते पहाटे तीन पर्यंत सुरु होती. यावेळी आठ ते दहा जण होते असेही अनिल देशमुख म्हणाले. त्यानंतर अजितदादा, सुनील तटकरे आणि सुप्रिया सुळे यांची देखील वेगळी बैठक झालीहोती. राष्ट्रीय अध्यक्षाचा निर्णय त्यांचा पक्ष ठरवेल असेही अनिल देशमुख म्हणाले.

# राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवारच!

## बाकी अफवा !

मुंबई/प्रतिनिधी

**अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा कोणाच्या खांद्यावर सोपवली जाणार, याबाबत चर्चांना उधाण आलं आहे. अध्यक्षपदाच्या स्पर्धेत सुनेत्रा पवार यांचे नाव सर्वात आघाडीवर असलं तरी राष्ट्रवादीचे कार्यकारी अध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची चर्चाही होती मात्र आता नवी माहिती समोर आली असून सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाल्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी त्यांचीच निवड निश्चित मानली जात आहे. पक्षाच्या संसदीय कार्यमंडळाची बैठक पुढील आठवड्यात आयोजित करून अध्यक्षपदावर त्यांचीच निवड करण्यात येऊ शकते, अशी माहिती आहे. सुनेत्रा पवार यांना राष्ट्रीय अध्यक्ष करण्यासाठी आमदारांनी एका पत्रावर सह्या केल्याचंही सांगण्यात आलं आहे.**



अजित पवार हयात असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणावर चर्चा सुरू होती आणि त्यासाठी सर्वजण प्रयत्न करत होते. सध्या पक्षाचे सर्व अधिकार सुनेत्रा पवार यांच्याकडे सोपवण्यात आले आहेत. विधिमंडळ गटनेत्याची निवड झाली असून, त्यांच्याकडेच अधिकार आहेत.

सर्व नेते आणि आमदारांनी सुनेत्रा पवार यांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी नेमण्याबाबत एका पत्रावर सह्या केल्या आहेत. दशक्रिया विधीनंतर उपमुख्यमंत्रिपदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर व राष्ट्रीय अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर सुनेत्रा पवार आपली भूमिका स्पष्ट करतील. तोपर्यंत सर्व अधिकार त्यांच्याकडेच असतील, असा गौप्यस्फोट आमदार अमोल मिटकरी यांनी केला.

दरम्यान, यावेळी अमोल मिटकरी यांनी भाजप नेते पियुष गोयल यांच्यावरही टीका केली. गोयल हे राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य नसून भाजपचे नेते आहेत. दुसऱ्याच्या पक्षात नाक खुपसल्याने त्यांचे नाक जळालं आहे, असा हल्लाबोल मिटकरींनी केला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर प्रफुल पटेल यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याची थेट माहिती केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी एका वृत्तसंस्थेच्या मुलाखतीत म्हटलं होतं, मात्र स्वतः प्रफुल्ल पटेल यांनी या वृत्तांचा इन्कार केला.

### माणिकराव कोकाटेंनी ठणकावलं; स्पष्टच म्हणाले, ओन्ली वन सुनेत्रा पवार !

राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या चाललेल्या चर्चेवर माणिकराव कोकोटेंनी ठणकावलं आहे. ते म्हणाले, अजित पवार यांच्या उत्तराधिकारी सुनेत्रा पवार याच असणार आहेत सुनेत्रा पवारच राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्ष होतील. त्या उपमुख्यमंत्री, विधिमंडळ पक्षाच्या नेत्या असतील आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा सुनेत्रा पवारच असतील असं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे. अजित पवार यांचे निधन झाले त्यावेळीही कोकाटे यांनी हे सांगितलं होतं.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपल्याला जे लागत नाही ते स्वस्त केलंय !